MHMM180085762018

फौ. किरकोळ अर्ज क्र. २८३/कि.अ./२०१८

## निशाणी - १ खाली आदेश
(दिनांक - ०५.०२.२०२१)

१. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज फिर्याद दाखल करण्यास झालेला विलंब माफ होण्याकरिता केलेला आहे. अर्जदारा ही कंपनी असून जाब देणार यांनी कायदेशीर देणे देण्या करीता धनादेश क्र. ०१४३६६ हा रुपये १५,००,०००/- चा दिनांक १४-०५-२०१८ रोजी दिला होता. सदरचा धनादेश बँकेत भरला असता तो न वटता दिनांक १६-०५-२०१८ रोजी "अपुरा निधी" या शे-याने परत आला. त्यानंतर अर्जदाराने वकीला मार्फत दि. ०८-०६-२०१८ रोजी नोटीस पाठवली. सदरची नोटीस जाब देणार क्र. २ व ३ यांना दिनांक ११-०६-२०१८ व १९-०६-२०१८ रोजी मिळाली व जाब देणार क्र. १ ला पाठवलेली नोटीस दि. २३-०६-२०१८ रोजी न स्वीकारल्यामुळे परत आली. नंतर जाब देणार यांनी धनादेशाची रक्कम दि. २६-०६-२०१८ पर्यत देणे आवश्यक होते, परंतु त्यानी ती रक्कम दिली नाही. त्यानंतर ३० दिवसांमध्ये म्हणजेच दि. २४-०७-२०१८ पर्यत अर्जदार यांनी फिर्याद दाखल करणे गरजेचे होते. परंतु अर्जदार यांनी दि. ०८-०८-२०१८ फिर्याद दाखल केली. सदरची फिर्याद दाखल करण्यास १५ दिवस विलंब झाला आहे. सदरचा विलंब माफ करण्यात यावा म्हणून अर्जदार याने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. फिर्यादी कंपनीचे जयपूर येथे एक कार्यालय असून मागणी नोटीस जयपूर येथील वकील अखील मोदी यांनी पाठवली होती. सदरची फिर्याद मुंबई येथे दाखल करण्यासाठी त्यांनी पाठवलेली कागदपत्रे दि. ०३-०८-२०१८ रोजी जयपूर येथील कार्यालयात मिळाली. सदरची कागदपत्रे मुंबई येथील वकीलाकडे पाठविण्यात आली. ती कागदपत्रे दि. ०६.०८.२०१८ रोजी वकीलांना मिळाली, त्यानंतर फिर्याद तयार करुन दि. ०८.०८.२०१८ रोजी दाखल केली. जयपूर येथून कागदपत्रे मिळण्यास उशिर झाल्यामुळे फिर्यादीला मुदतीत फिर्याद दाखल करता आली नाही, परंतु फिर्यादीने हेतूपूर्वक विलंब केलेला नाही. सबब सदरचा विलंब माफ करण्यात यावा अशी विनंती फिर्यादीचे वकील दिलीप दवागे

यांनी केली.

२. जाब देणार यांना नोटीस मिळाल्यानंतर वकीलामार्फत हजर झाले परंतु त्यानी सदर अर्जास म्हणणे सादर केलेले नाही. फिर्यादी ही कंपनी असून तीचे मुंबई व जयपूर येथे कार्यालय आहे. मागणी नोटीस ही जयपूर येथून पाठवल्यानंतर त्या बाबतचे कागदपत्रे मुंबई येथील वकीलांना पाठविण्यास वेळ लागल्याने फिर्यादीला मुदतीत फिर्याद दाखल करता आली नाही. फिर्यादीने हेतूपूर्वक विलंब केलेला नाही, हा फिर्यादीचे वकीलांचा युक्तीवाद संयुक्तीक वाटतो. सदरची फिर्याद दाखल करण्यास परवानगी दिल्याने आरोपीचे नुकसान होण्याची शक्यता नाही. उलटपक्षी विलंब माफ न केल्यास फिर्यादीला नुकसान होण्याची शक्यता आहे. सबब नैसर्गीक न्यायतत्वानुसार सदरचा विलंब माफ करणे योग्य व संयुक्तीक होईल असे मला वाटते. सबब मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करित आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार याने न्यायालयीन प्रक्रियेचा खर्च म्हणून रु. ५,०००/- शासनास एक महिन्यामध्ये अदा करावेत.

३. अर्जदार यांनी खर्चाची रक्कम अदा केल्यानंतर सदर प्रकरण समन्स खटला म्हणून नोंदविण्यात यावे.

05/02/2021.

(माणिक ये. वाघ)
महानगर दंडाधिकारी,
५८वे न्यायालय, वांन्द्रे, मुंबई

मुंबई, दिनांक – ०५.०२.२०२१